# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (0721) 257 7913


## परिपत्रक

क्रमांक :-विकाअ/शिक्षण/२०१७-१८/१४९८

महत्वाचे

दिनांक 27 JUN 2017

प्रति,

प्राचार्य,
शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका,
संस्था,अमरावती विभाग, अमरावती.

**विषय:-** शैक्षणिक वर्षे २०१६-२०१७ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/पदविका अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे किंवा विभागांतर्गत विद्यार्थ्यांना संस्था स्थलांतर/बदली करण्यास विभागीय कार्यालय स्तरावर मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुबई यांचे पत्र क्र :- १०/एनजीपी/संस्था स्थलांतरण/२०१७/३५०० दि १६/६/२०१७
२. १०/एनजीपी/विद्यार्थी बदली/२०१७-१८/३५७९ दि २३/०६/२०१७

शैक्षणिक वर्षे २०१६-२०१७ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था/पदविका अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे किंवा विभागांतर्गत विद्यार्थ्यांना संस्था स्थलांतर/बदली करण्यास विभागीय कार्यालय स्तरावर संस्था स्थलांतरण करण्याबाबतची कार्यवाही हया विभागीय कार्यालय स्तरावर करण्यात येणार असल्याने खालील नमुद प्रकरणी सबंधित संस्थेने/विद्यार्थी यांनी संस्था स्थलांतरणाबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्थेस/अभ्यासक्रम बंद करणा-यास मान्यता देण्यात आलेली असल्यास याबाबत सबंधित संस्थेने विद्यार्थी स्थलांतरणाबाबत/बदलीबाबत प्रस्ताव सादर केलेला असल्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता व्दितीय वर्ष व तृतिय वर्षाकरीता पात्र झालेले विद्यार्थी.
२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेस मुदतवाढ देण्यात आलेली नसल्यास/ नो-ॲडमिशन कॅटेगिरीत असल्यास याबाबत सबंधित संस्थेने विद्यार्थी स्थलांतरणाबाबत/बदलीबाबत प्रस्ताव सादर केलेला असल्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता व्दितीय वर्ष व तृतिय वर्षाकरीता पात्र झालेले विद्यार्थी.
३. विभागांतर्गत एका संस्थेतुन दुस-या अन्य संस्थेत स्थलांतराने विद्यार्थी बदलीबाबत संबंधित प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमात उत्तिर्ण विद्यार्थ्यामार्फत आलेला अर्ज.

तसेच अन्य संस्थामध्ये विभागांतर्गत स्थलांतराने विद्यार्थी बदली खालील बाबी विचारात घेऊन करण्यात यावी. तसेच व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्याची संस्था बदलीची कार्यवाही दिनांक ५/७/२०१७ पर्यंत पुर्ण करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

१) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.